|| श्री ||

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १२ मे २०२६ | ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

* सुविचार *

जो परोपकारी स्वभावाचा तो खरोखर थोर होय.

# पंतप्रधान मोदी यांच्या वक्तव्याने देशात भूकंप!

## शेअर बाजार गडगडला, पेट्रोल, डिझेलचा भडका? । तेल कंपन्यांचा तोटा वाढला

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पेट्रोल आणि डिझेलचा वापर जपून करण्याचे आणि कोरोना काळासारखी खबरदारी घेण्याचे आवाहन केल्याने देशभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या वक्तव्याने एक तर शेअर बाजार गडगडला. रुपयाची आणखी घसरण झाली. त्यातच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ करण्याचे स्पष्ट संकेतही मिळत आहेत. त्यामुळे देशात महागाईचा भडका उडण्याची भीती व्यक्त होत असून, देशात आता भूकंप होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. कारण इंधन बचत करण्यासाठी मेट्रोने प्रवास करा, वर्क फ्रॉम होम करा, हे सांगण्या त्यांनी देशात पेट्रोल, डिझेल, गॅसचे दर भरमसाठ वाढविण्याचे स्पष्ट संकेत दिल्याचे मानले जात आहे.

अमेरिका आणि इस्राइलने फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस इराणविरोधात सुरू केलेल्या युद्धामुळे आखाती देशांमध्ये निर्माण झालेली तणावपूर्ण परिस्थिती अद्याप निवळलेली नाही. या तणावपूर्ण परिस्थितीमुळे आखातातून होणा-या खनिज तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्याला मोठा फटका बसला आहे. तसेच त्याची झळ भारताला बसू लागली आहे. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पेट्रोल आणि डिझेलचा वापर जपून करण्याचे आणि कोरोनाकाळासारखी खबरदारी घेण्याचे आवाहन केल्याने देशभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात लवकरच वाढ होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

यादरम्यान, पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी मोदी यांनी दिलेला सल्ला मानणे का आवश्यक आहे, तसेच पेट्रोल, डिझेलचे दर न वाढल्याने पेट्रोलियम कंपन्यांना किती तोटा होत आहे, याचे गणित मांडले. त्यामुळे आता देशात पेट्रोल डिझेलचे दर किती वाढू शकतात, याबाबत अंदाज बांधले जात आहेत. आंततराष्ट्रीय बाजारात खनिज तेल, गॅस आणि एलपीजीच्या किमती गगनाला भिडत आहेत. तेल कंपन्या महागड्या दराने कच्च्या मालाची खरेदी करत आहेत. मात्र, सामान्य जनतेला महागाईची झळ बसू नये, म्हणून पेट्रोल, डिझेल आणि गॅस जुन्या आणि कमी दरांत विकत आहेत, असेही पुरी म्हणाले.

दरम्यान, आखाती देशांमधील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या उत्पादन शुल्कात १० रुपयांनी कपात केली होती. त्यामुळे केंद्राचाही दरमहा १४ हजार कोटी रुपयांचा महसूल बुडत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर बिघडलेल्या परिस्थितीमुळे ही कपातही तेल कंपन्यांचा तोटा कमी करण्यास अपुरी पडली आहे.

सध्या तेल कंपन्यांना पेट्रोलवर प्रतिलिटर १८ रुपये आणि डिझेलवर प्रतिलिटर २५ रुपये एवढा तोटा होत आहे. त्यामुळे जर सरकारने पेट्रोलची किंमत १८ रुपये प्रतिलिटर आणि डिझेलची किंमत २५ रुपये प्रतिलिटर एवढी वाढवली तर बीपीसीएल आणि एचपीसीएलसारख्या कंपन्यांचा तोटा शुन्यावर येऊ शकतो. त्यामुळे पेट्रोल, डिझेलसह गॅस सिलिंडर महागण्याची भीती व्यक्त



केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पुढील वर्षभर सोने खरेदी करू नका, परदेशात प्रवास टाळा, पेट्रोल-डिझेलचा वापर बेताने करा, असे म्हटले. याचे पडसाद शेअर बाजारातही उमटले. आज सकाळी बाजाराची सुरूवात नकारात्मक झाली. निफ्टी २५० अंकांनी खाली गेला तर सेंसेक्स एक हजार अंकांनी कोसळला. शेअर बाजारातील या घसरणीमागे मोदींच्या आवाहनासोबतच इराण युध्दावर तोडगा काढण्याचे प्रयत्न फोल ठरत असल्याचे कारणही आहे.

शेअर बाजारात घसरणीसोबतच डॉलरच्या तुलनेत रुपयाचीही घसरण झाली. सुरूवातीलाच रुपया ४० पैशांनी घसरला. कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्याने रुपया कमजोर झाल्याचे चित्र आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केल्यानंतर भारतात सराफा व्यवसायावर मोठा परिणाम होईल, अशी शंका ऑल इंडिया जेम अ‍ॅप ज्वेलरी कौन्सिलने व्यक्त केली. लोकांनी सोने खरेदी बंद केले तर एक कोटी लोकांच्या रोजगारावर परिणाम होईल. मात्र, राष्ट्रहित लक्षात घेऊन आवाहन केल्याने त्याला आमचे समर्थन आहे, असेही म्हटले.

### तेल कंपन्यांना रोज १ हजार कोटींचा तोटा?

■ सरकारी तेल कंपन्यांना दररोज १ हजार कोटी रुपयांचा तोटा होत आहे. चालू तिमाहीत कंपन्यांचा एकूण तोटा हा १ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. पेट्रोलियम मंत्र्यांनी मांडलेल्या या गणितामुळे देशात पेट्रोल, डिझेलच्या किमती बऱ्याच वाढू शकतात, असा अंदाज बांधला जात आहे.

### कच्चे तेल महागले

■ अमेरिका-इराण या दोन्ही देशांमधील चर्चेची गाडी रुळावरून घसरल्याने जागतिक बाजारात आज कच्च्या तेलाच्या किमतीत उसळी पाहायला मिळाली. १० आठवड्यांपासून सुरू असलेल्या या संघर्षामुळे आधीच पुरवठा विस्कळीत झाला होता. आता त्यात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणार आहे.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### देशभक्ती

चहूबाजुंनी होतो
आधीच किती कंगाल
त्यात पुन्हा नव्याने
हाती आले बंगाल

देशभक्ती म्हणून आता
पंचसूत्री पाळायची
सोन्याहून पिवळे म्हणत
खरेदी तेवढी टाळायची

वीरभूमी

## SPOT NEWS

### देश चालवणे मोदीजींच्या क्षमतेबाहेर : खा. राहुल गांधी

**● नवी दिल्ली –** इराणमधील संघर्षमय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (१० मे) देशातील नागरिकांना एक महत्त्वपूर्ण आवाहन केले. त्यांनी नागरिकांना सोन्याची खरेदी टाळण्याचे, परदेश प्रवास मर्यादित करण्याचे आणि पेट्रोलचा वापर कमी करण्याचं आवाहन केलं. याव्यतिरिक्त, त्यांनी कंपन्यांना त्यांच्या 'वर्क फ्रॉम होम'व्यवस्थांचा विस्तार करण्याचे आवाहन केलं आहे. पंतप्रधान मोदींच्या या आवाहनावर काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, हे केवळ सल्ले नसून, ते अपयशाचे पुरावे आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर एक पोस्ट शेअर केली. त्या पोस्टमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'तडजोड करणारे पंतप्रधान' असं संबोधलं.

### इराण-अमेरिका यांच्यातील शांतता चर्चा फिस्कटली

**● नवी दिल्ली –** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या शांतता प्रस्तावावरील प्रतिक्रियेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. रविवारी (१० मे) इराणने पाकिस्तानी मध्यस्थांच्या माध्यमातून अमेरिकेच्या शांतता प्रस्तावाला आपले उत्तर पाठवले होते. मात्र, ट्रम्प यांनी त्या उत्तराचा आढावा घेतल्यानंतर ते समाधानकारक नसल्याचे सांगितले. ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळे इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव कमी करण्याच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे.

# 'नीट २०२६' चा पेपर फुटला?

**● जयपूर । वीरभूमी –**

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नीट परीक्षेवर पुन्हा एकदा पेपरफुटीचे सावट निर्माण झाले आहे. ३ मे रोजी झालेल्या या परीक्षेतील प्रश्नांशी मिळता-जुळता असलेला संभाव्य प्रश्नसंच परीक्षेपूर्वीच सोशल मीडियावर फिरत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलाने सखोल चौकशी सुरू केली असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने देखील या प्रकरणाची दखल घेतली आहे.

राजस्थानचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विशाल बन्सल यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षेच्या काही दिवस आधी सुमारे ४०० प्रश्नांचा एक संभाव्य प्रश्नसंच व्हायरल झाला होता. या संचातील जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र विषयांचे १०० हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांशी तंतोतंत जुळणारे आहेत. हा केवळ योगायोग आहे की एखादे मोठे रॅकेट, याचा तपास पोलीस करत आहेत. यासाठी राजस्थानमधील अनेक शहरे आणि डेहराडूनमध्ये चौकशी सुरू आहे.

राजस्थानप्रमाणेच महाराष्ट्रातील लातूरमधील एका नामांकित कोचिंग अकॅडमीचे काही व्हिडिओ आणि टेस्ट-सीरीजचे पेपर्स सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. या संदर्भात लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले की, अद्याप स्थानिक स्तरावर कोणताही अधिकृत तपास सुरू करण्यात आलेला नाही. मात्र, या प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्याच्या चर्चेने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# पत्नीला सन्मानाचा पूर्ण अधिकार : सुप्रीम कोर्ट

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

सर्वोच्च न्यायालयाने घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणात एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. पतीने पत्नीला सन्मानाची वागणूक दिली पाहिजे. पत्नी म्हणजे जनावर किंवा पशू नाही की तुम्ही तिला कसेही वागवाल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती पी. बी. वराले यांच्या खंडपीठाने एका आरोपीच्या अंतरिम जामीन अर्जावर सुनावणी करताना हा निर्णय दिला.

पाटणा या ठिकाणी राहणाऱ्या एका इसमाने दारु पिऊन त्याच्या पत्नीला मारहाण केली. हे प्रकरण पाटणा उच्च न्यायालयात गेले. त्यानंतर पाटणा उच्च न्यायालयानेही या प्रकरणात आरोपीला जामीन नाकारला. तसेच सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणात आरोपीला अंतरिम जामीन नाकारला. घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणात आरोपीने दारुच्या नशेत घरी आल्यानंतर पत्नीला मारहाण केली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दारू पिऊन हा पती घरी आला. त्याने त्याच्या पत्नीला मारहाण केली आणि तिला जमिनीवर ढकलून दिले. या घटनेत त्याच्या पत्नीचे डोके विटेला लागले. यानंतर या माणसाने त्याच्या पत्नीवर काठीने हल्ला केला आणि तिला मारहाण केली.

या प्रकरणी पोलिसांनी अशीही माहिती दिली की, आरोपीची तीन लग्ने झाली आहेत. दुसरीकडे आरोपीने ज्या महिलेने मारहाणीची तक्रार केली, तिच्याशी लग्नच झालेले नाही, असा दावा केला आणि जामीन मिळावा म्हणून अर्ज केला होता. पाटणा उच्च न्यायालयाने हा जामीन अर्ज फेटाळला. ज्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर गेले होते. पाटणा उच्च न्यायालयाने जामीन फेटाळताना असेही म्हटले होते की सदर आरोपी हा जर तीन लग्न करू शकतो आणि पहिल्या पत्नीचे पालन पोषणही करत नाही तर तिला तो मारहाण कशी करु शकतो, त्याला जामीन मिळणार नाही. यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही त्याला जामीन नाकारला.

# खा. निलेश लंके यांचे भोंदूबाबा नानासाहेब वीरकर सोबतचे फोटो व्हायरल

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नाशिक जिल्ह्यात खरात प्रकरण अजूनही ताजेच असताना, सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातून रविवारी एक धक्कादायक घटना समोर आली. माढा तालुक्यातील आहेगाव येथे दरबार भरवणारा कथित भोंदूबाबा नानासाहेब विरकर उर्फ गुरु माऊली महाराज आणि त्याच्या भावाला पोलिसांनी अटक केली आहे. भोंदूगिरी, फसवणूक आणि आर्थिक लुबाडणुकीसह विविध कलमांखाली त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या प्रकरणात आता आणखी एक खुलासा झाला असून खासदार निलेश लंके आणि भोंदूबाबा नानासाहेब विरकर याचे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेले आहे.यामुळे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली असून भोंदू बाबा वीरकर आणि शरदचंद्र पवार गटाचे खासदार लंके यांच्यातील जवळीक घट्ट असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गुरु माऊली महाराज हा आहेगाव येथील स्वतःच्या पाच एकर जागेत एसी दरबार भरवत होता. दरबारात आलेल्या भक्तांनी फक्त नाव सांगितल्यानंतर त्यांच्या बँक खात्याचा क्रमांक आणि खात्यातील शिल्लक रक्कम अचूक सांगत असल्याचा दावा केला जात होता. त्यामुळे अनेक भाविक त्याच्याकडे आकर्षित होत होते.दरम्यान, खासदार निलेश लंके आणि त्यांच्या पत्नी राणी लंके यांचे या गुरुमाऊलीसोबतचे काही जुने फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. विशेषतः या भोंदू बाबाचा आशीर्वाद घेताना निलेश लंके थेट खाली वाकलेले फोटोमध्ये दिसून येत आहेत. राणी लंके जिल्हा परिषद सदस्य असताना गुरुमाऊली भक्त परिवाराने त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्याचा फोटो समोर आला आहे. तसेच एका फोटोमध्ये खासदार निलेश लंके यांनी गुरुमाऊलीला शाल घालून सन्मान केल्याचे दिसत आहे. आणखी एका छायाचित्रात ते गुरुमाऊलीच्या पायावर डोकं ठेवून आशीर्वाद घेताना दिसत असल्याने या प्रकरणाची चर्चा अधिक रंगली आहे.

खासदार निलेश लंके यांच्या सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये करेक्ट नियोजन, परफेक्ट कार्यक्रम अशी कॅप्शन देत गुरुमाऊलीचा आशीर्वाद मिळाल्याचा उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे आता या फोटो आणि पोस्टवरून विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे.स्थानिक स्तरावर गुरुमाऊलीबाबत अनेक दावे केले जात होते. बंगालमध्ये सात-आठ वर्षे राहून त्याने काळी विद्या शिकल्याची चर्चा होती. तसेच तो स्वतःला हनुमानाचा अवतार असल्याचे सांगत असल्याचाही दावा केला जात आहे.राजकारणात विजय मिळवून देण्याची क्षमता असल्याचे तो सांगत असल्याने, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान त्याचा काही प्रभाव होता का, अशा चर्चाही आता सुरू झाल्या आहेत. मात्र, या सर्व दाव्यांना अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.

पोलिस तपासानंतरच सत्य स्पष्ट होणार सध्या पोलिस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत असून, आर्थिक फसवणूक आणि भोंदूगिरीच्या आरोपांची चौकशी सुरू आहे. खासदार निलेश लंके आणि या कथित भोंदूबाबामधील नेमके





संबंध काय होते, याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. मात्र, तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणातील सत्य समोर येणार आहे.

SPOT NEWS

## पाटबंधारे व सा.बांधकाम खाते कर्मचारी संस्थेची १७ मे रोजी सर्वसाधारण सभा

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेची अधिकृत नोटीस संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात आली असून सर्व सभासदांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सभेचे अध्यक्षस्थान संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, स्वप्नील विजय काळे यांच्या अध्यक्षतेखाली राहणार आहे. ते उपस्थित राहू शकले नाहीत, तर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लक्ष्मीकांत बबनराव जाधव हे अध्यक्षस्थान भूषवतील. तसेच, अपरिहार्य कारणास्तव पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही अनुपस्थित राहिल्यास, संस्थेचे चेअरमन जगदीश भगवान वाघ, व्हाईस चेअरमन किशोर धोंडीराम सांगळे व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत सभा पार पडणार आहे. या सभेमध्ये अनेक महत्त्वाचे विषय मांडण्यात येणार असून त्यामध्ये अध्यक्षांची नियुक्ती, सन २०२५-२६ च्या नफ्याचे सहकार कायद्यानुसार २५ टक्के ऐवजी १० टक्के गंगाजळी वर्गीकरणाबाबत निर्णय, तसेच अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा होणार आहे. सभेच्या शेवटी आभार प्रदर्शन करून सभा विसर्जित करण्यात येईल. दरम्यान, गणपूर्ती न झाल्यासही सभा नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येणार असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.ही सभा संस्थेच्या पुढील कामकाजासाठी दिशा ठरवणारी असून सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चेअरमन जगदीश वाघ, व्हाईस चेअरमन किशोर सांगळे व प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद परदेशी यांनी केले आहे.

## पब्लिक स्कूल वाळुंज शाळेचा १००% निकाल

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

पब्लिक स्कूल वाळुंज शाळेचा या वर्षी देखील इयत्ता १० वी (एसएससी) बोर्डाचा निकाल १००% लागला आहे. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे.शाळेच्या स्थापनेला २४ वर्षे पूर्ण होत असून, एसएससी बॅचच्या १४ व्या वर्षी उतरोत्तर शाळेची गुणवत्ता वाढत चालली आहे. विद्यालयाची विदयार्थीनी आदिती श्रीराम गोरे हिने ९०.२०% गुण मिळवून ती प्रथम आली आहे. विशेष प्रविण्य मध्ये ०५ विद्यार्थी तर प्रथम श्रेणी मध्ये १० विद्यार्थी, द्वितीय श्रेणी मध्ये ०४ विद्यार्थी तर तृतीय श्रेणी मध्ये ०१ विद्यार्थी अशी श्रेणी प्राप्त केली आहे. विशेष म्हणजे या विदयार्थ्यांनी कोणतीही बाहेरची शिकवणी न लावता स्वतः च्या अभ्यासावर आणि अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनावर यश मिळविले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कृषिभूषण सबाजीराव गायकवाड, संस्थेचे सचिव प्रशांत गायकवाड तसेच प्राचार्या, शिक्षकावृंद, पालक यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अकोले तालुक्यात जनगणना प्रशिक्षण उत्साहात

### ६९ पर्यवेक्षक व ४५८ प्रगणक सज्ज । १६ मे ते १४ जूनदरम्यान डिजिटल पद्धतीने जनगणना मोहीम

**● अकोले । वीरभूमी -**

देशाच्या भविष्यासाठी विकासाचा पाया ठरणारी जनगणना मोहीम आता वेग घेत असून अकोले तालुक्यात प्रशासनाने जनगणनेसाठी कंबर कसली आहे. या मोहिमेसाठी एकूण ४५८ प्रगणक व ६९ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना टप्प्याटप्याने प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे प्रगणक व पर्यवेक्षक जनगणनेसाठी सज्ज झाले आहेत.



यावर्षीची जनगणना पारंपरिक कागद-पेनऐवजी पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असल्याने माहिती अधिक अचूक, सुरक्षित व वेगवान पद्धतीने संकलित होणार आहे. ही जनगणना अकोले तालुक्याचे तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

तालुक्यातील सर्व प्रभागांची जबाबदारी प्रगणकांवर सोपविण्यात आली असून ते प्रत्येक घरापर्यंत जाऊन माहिती संकलित करणार आहेत. जनगणना मोहिमेबाबत मार्गदर्शन करताना तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, नायब तहसीलदार किसन लोहरे तसेच महसूल सहाय्यक भाऊराव डगळे यांनी विविध सूचना देत मोहिमेस सहकार्य करण्याचे आवाहन केले.

प्रशासनाने नागरिकांसाठी स्वयं-गणना सुविधा देखील उपलब्ध करून दिली असून नागरिकांना ऑनलाईन पोर्टलवर जाऊन स्वतःची माहिती स्वतः भरता येणार आहे. त्यामुळे प्रगणकांचा वेळ वाचून काम अधिक सुलभ होणार आहे.

प्रगणक जेव्हा नागरिकांच्या घरी येतील, तेव्हा त्यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता अचूक माहिती देऊन या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

यावेळी तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली फिल्ड ट्रेनर प्रा. संतोष नवले, प्रा. सचिन लगड, प्रा. शशीकांत लेंभे, प्रा. आदेश बांगर, प्रा. जुबेर बागवान, प्रा. शुभम बोरसे, प्रा. विठ्ठल कवटे, प्रा. श्रीराम देशमुख आदींनी प्रगणक तसेच पर्यवेक्षकांना जनगणना मोहिमेचे प्रशिक्षण दिले. जनगणना प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन व प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष फिल्डवर प्रशिक्षण देण्यात आले.

जनगणना २०२७ अंतर्गत १६ मे ते १४ जूनदरम्यान मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. या मोहिमेच्या माध्यमातून तालुक्यातून निवडलेले अधिकारी प्रत्यक्ष घरापर्यंत जाऊन सखोल तपासणी करून माहिती संकलित करणार आहेत.

> जनगणना दोन टप्प्यांत होणार असून पहिल्या टप्प्यात इमारत व घरगणना केली जाणार आहे. ही प्रक्रिया जलद व पारदर्शक असून हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने अचूक माहिती नोंदवणे आवश्यक आहे. प्रशिक्षणामुळे प्रगणक व पर्यवेक्षक अधिक सक्षमपणे माहिती संकलित करून जनगणना यशस्वी करतील.
>
> **- डॉ. सिद्धार्थ मोरे,** तहसीलदार

## शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे शिक्षक सेनेकडून स्वागत; शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे हे अहिल्यानगर दौऱ्यावर आले असता शिक्षक सेनेच्या वतीने त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी श्रीराम खाडे, ललित वकचौरे, राजेंद्र सोनवने आदी मान्यवर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान शिक्षण क्षेत्रातील विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांपासून शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेपर्यंत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींसह विद्यार्थ्यांच्या हिताच्या अनेक विषयांकडे शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले. बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेत शिक्षकांना येणाऱ्या प्रशासकीय अडचणी, शाळांमधील मूलभूत सुविधांची गरज, ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रश्न आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना यावरही चर्चा झाली. शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी शिक्षकांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्या सोडविण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित बाबींवर लक्ष देण्याचे आश्वासन दिले. शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## अकोले तालुका शिक्षक चषक पर्व-२ उत्साहात

### बीट-शेंडी संघ विजेता । शिक्षकांच्या क्रिकेट स्पर्धेचा पहिला प्रयोग : आ. डॉ. लहामटे

**● अकोले । वीरभूमी-**

अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेली अकोले तालुका शिक्षक चषक स्पर्धा २०२६ - पर्व-२ ही दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धा आयटीआय मैदान, अकोले येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत तालुक्यातील शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या मार्गदर्शनाखाली व गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग, दोन दिवसीय भव्य क्रिकेट स्पर्धा, विविध समित्यांचे उत्कृष्ट नियोजन आणि सांघिक भावना ही स्पर्धेची विशेष आकर्षणे ठरली. तसेच स्पर्धेचे युट्युब लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले.

शिक्षकांमध्ये आरोग्य, एकोपा व तणावरहित वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत २० ते ५५ वयोगटातील शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे शिक्षकांना दैनंदिन कामाच्या व्यापातून विरंगुळा मिळाला असून शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत झाली.

गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी मागील वर्षी २ मार्च २०२५ रोजी पहिली स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केली होती. त्यानंतर यंदाचे पर्व-२ अधिक भव्य स्वरूपात पार पडले. क्रिकेटप्रेमी शिक्षकांनी मैदानावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेला रंगत आणली.

अंतिम सामन्यात बीट-शेंडी संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. शिक्षकांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम तालुक्यात कौतुकाचा विषय ठरला असून उपस्थितांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

> अशा उत्कृष्ट नियोजन असलेल्या स्पर्धांना आपण सर्वतोपरी सहकार्य व मदत करू. कारण शिक्षक शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ असेल, तर समाजही निश्चितच सुदृढ घडेल.
>
> **- आमदार डॉ. किरण लहामटे**

## आ. आशुतोष काळे यांच्या लोकहिताच्या

# दृष्टीकोनातून प्रशासन आणि नागरीकांमधील दरी कमी

### महाराजस्व समाधान शिबिरातून सेवा तुमच्या दारी संकल्पना प्रत्यक्षात उतरली

**● कोपरगाव । वीरभूमी-**

मतदार संघातील नागरीकांना आवश्यक असलेले सर्व प्रकारचे शासकीय दाखले एकाच छताखाली आणि एकाच वेळी कमी वेळेत आणि कमीत कमी त्रासात उपलब्ध व्हावेत यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीराचे मत्दर संघातील प्रत्येक महसूल मंडळात प्रभावीपणे आयोजन केल्यामुळे ‘महसूलची सेवा तुमच्या दारी’हि संकल्पना प्रत्यक्षात उतरली असल्याचे समाधानकारक चित्र सोमवार (दि.११) रोजी कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दहेगाव बोलका याठिकाणी पहावयास मिळाले.

महायुती शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत नागरिकांचे शासकीय विभागांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी आ. आशुतोष काळे यांच्या पुढाकारातून दहेगाव बोलका मंडळात महाराजस्व अभियान समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि महिला यांना प्रशासकीय कामांसाठी कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याचा त्रास वाचला असून आ.आशुतोष काळे यांच्या पुढाकारातून महादेव मंदिर दहेगाव बोलका येथे आयोजित महाराजस्व शिबिरात अनेक नागरीकांना हवे असलेले विविध दाखले एकाच दिवसात आणी अतिशय कमी वेळात मिळाली आहे. यावेळी उपस्थितांच्या हस्ते नागरिकांना विविध दाखल्यांचे, प्रमाणपत्र, उतारे आणि इ रेशन कार्ड चे वितरण करण्यात आले.

सर्वसामान्य नागरीकांन शासकीय कामांसाठी अनेक वेळा कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत होत्या. मात्र ‘महाराजस्व’ अभियानामुळे नागरिकांची ही गैरसोय मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. प्रशासनाच्या समन्वयातून नागरिकांना आवश्यक कागदपत्रे जलद गतीने मिळत असल्याने वेळ आणि श्रम दोन्हींची बचत होत आहे. या अभियानांतर्गत उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर आदी महत्त्वाचे दाखले सहज उपलब्ध करून दिले जात आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना या उपक्रमाचा मोठा फायदा होत असून, शासकीय सेवा अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख होत असल्याची भावना नागरीकांकडून व्यक्त केली जात आहे.




यावेळी नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे, मंडलाधिकारी अनिल मांढरे, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, दहेगाव बोलकाचे सरपंच भरत चौधरी, उपसरपंच रितेश भवर, भाऊराव देवकर, विजय वल्टे, भोजडेचे सरपंच सुधाकर टूपके, चंद्रकांत जाधव, भागीनाथ वादे, लौकीचे सरपंच आजीनाथ शेळके, जगनराव बागल, जनार्दन खटकाळे, शिवाजीराव ठाकरे, दिगंबर भवर, सुनिल वालतुरे, बद्रीनाथ जाधव, राजेंद्र खिलारी, बबनराव वल्टे, सिद्धेश्वर वारकर, नानासाहेब डोंगरे, गोपाल कुलकर्णी, शासकीय अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## दहावीत सख्या बहीण भावाने मिळविला प्रथम व द्वितीय क्रमांक



**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील मेहेंदुरी येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय मेहेंदुरी येथील विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.०७ टक्के लागला आहे. परीक्षेमध्ये यश मिळविलेल्या ५२ विद्यार्थ्यांपैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात १ विद्यार्थी अनुपस्थित असल्याने निकाल घसरला आहे.यामध्ये विशेष श्रेणी १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.प्रथम श्रेणीत १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. द्वितीय श्रेणीत १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर तृतीय श्रेणीत ०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. उज्वल निकाला मुळे पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयात सख्या जुळ्या बहीण– भावाने प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून आई वडिलांची मान उंचावली आहे. यात प्रथम क्रमांक श्रद्धा सुनील गुंजाळ ९२.६० टक्के मिळवत विद्यालयात प्रथम आली.साई सुनील गुंजाळ ८७.२० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला.तर प्रज्वल बबन हासे ८६.०० टक्के मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला. दिव्या पंकज बंगाळ हिने ८३.२० टक्के मिळवत चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तर पाचवा स्वराज अनिल कदम ८२.००, नयन चिंधू कौटे ८०.८०, सार्थक संग्राम फरगडे ७८.००, तर साईराजे पोपट बंगाळ ७७.६०, आराध्या संतोष बंगाळ ७७.४०, तनुजा शिवाजी आरोटे ७५.४०, आर्यन अर्जुन चासकर ७४.६०, वैष्णवी दत्तात्रय वावळे ७२.४०, सार्थक रामदास आरोटे ७२.४०, अजिंक्य शंकर गायकवाड ७२.४०, अनुराधा दत्तात्रय मेदगे ७२.२० व श्रध्दा दत्तात्रय पथवे ७०.८० टक्के मिळवून विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या यशात भर पाडली आहे. या यशाबद्दल स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष रमेशआण्णा जगताप, मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे, विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावच्या ग्रामस्थांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## महिलांच्या नेत्र तपासणीने मातृत्व दिवस साजरा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

मातृत्व दिनाचे औचित्य साधत फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजातील ज्येष्ठ महिला, गरजू नागरिकांचा या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात आयोजित या शिबिरात नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. अनेक महिलांनी यावेळी नेत्रदान व अवयवदानाचा संकल्प करत सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. या शिबिराचे उद्घाटन उपस्थित महिलांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, बुधराणी हॉस्पिटलचे विशाल भिंगारदिवे, ग्रामस्थ, महिला व फिनिक्सचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विनावर्गणी लोकसहभागातून श्रीगोंद्यात

# छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी होणार

### १४ व १५ मे रोजी विविध सामाजिक । सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती श्रीगोंदा शहरात १४ व १५ मे रोजी विनावर्गणी व लोकसहभागातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी महाराज चौक येथे होणाऱ्या या उत्सवानिमित्त मॅरेथॉन, सायकल स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, संगीत खुर्ची तसेच विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांना प्रेरणा मिळावी तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठ विचार समाजापर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी



सत्कार, शंभू शौर्य व्याख्यान आणि शाहिरी पोवाड्यांचेही आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावरील तब्बल ११०० पुस्तकांच्या प्रती नागरिकांना मोफत वितरित करण्यात येणार आहेत.

संपूर्ण उत्सव विनावर्गणी आणि लोकसहभागातून साजरा होत असल्याने तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सामाजिक संस्था, मान्यवर आणि नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य करत उत्सवात सहभाग नोंदविला आहे.

समितीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत श्रीगोंदा येथील नागरिक संदीप बजरंग घोडके यांच्या किडनी प्रत्यारोपणासाठी आर्थिक मदतही करण्यात आली आहे.

सर्व जाती–धर्मातील नागरिकांनी उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला असून श्रीगोंदा शहरात भव्य व ऐतिहासिक स्वरूपात जयंती साजरी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी समितीचे अध्यक्ष राजू दादा गोरे, उपाध्यक्ष विजय डहाळे, कोअर कमिटी सदस्य बालू मखरे, दिलीप लबडे, शाम जरे, दीपक मखरे, आरडे मेजर आदी उपस्थित होते.

## भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची बोर्ड परीक्षेत कामगिरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आर्थिक, सामाजिक तसेच कौटुंबिक अडचणींवर मात करत शिक्षणाची जिद्द कायम ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांनी रात्र शाळेत शिक्षण घेऊन पुन्हा एकदा यशाचे शिखर गाठले आहे. दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १० वी व १२ वी बोर्डाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत संघर्षातून यशाची प्रेरणादायी कहाणी निर्माण केली.

हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी एसएससी (इयत्ता १० वी) व एचएससी (इयत्ता १२ वी) बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळविले. काहींनी कंपनीत व विविध ठिकाणी दिवसा काम करुन रात्री शिक्षण घेतले. कार्यक्रम प्रसंगी रात्रशाळेत प्रवेशित होऊन इयत्ता १२ वीतील अनिशा आल्हाट, प्रिया आल्हाट, स्वाती अल्हाट या तिघी सख्या बहिणी, सुनीता लक्षेटी –ममता लक्षेटी या बहिणी, सोनाली शिंदे व पूजा शिंदे या जावा जावा व योगेश शिंदे व सोनाली शिंदे पती–पत्नी, दिपाली बनकर– राज बनकर आई –मुलगा, इयत्ता दहावीतील नवरा– बायको विजय लोंढे व निर्मला भालेराव यांनी यश संपादन केल्याबद्दल व रात्रशाळेत प्रवेशित आई सोबतच अभ्यास करणारे आई–मुलगा रुकसार शेख–अब्दुल शेख, पल्लवी गायकवाड–श्रेयस आई–मुलगी, स्वाती गडाख–ऋतुजा देखील एकत्र परीक्षा देऊन उत्तीर्ण झाले.

कार्यक्रमात नाईट हायस्कूलच्या माजी चेअरमन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी तसेच नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रात्रशाळेचे प्राचार्य सुनिल सुसरे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

इयत्ता १० वीच्या परीक्षेत विद्यालयाचा निकाल ७६ टक्के लागला. यामध्ये प्रथम : रेश्मा संपतलाल गांधी ६९.८०%, द्वितीय : अलीस जॉन डिसोजा ६९.४०%, तृतीय : रेखा अशोक गायकवाड ६६.४०% या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही सातत्यपूर्ण अभ्यास करत उल्लेखनीय यश मिळविले.

## पुणतांबा मंडळातील ६८०७ शेतकऱ्यांना १२.०२ कोटी पिक विमा मंजूर : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

मतदारसंघातील पुणतांबा मंडळात मागील वर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी तब्बल १२ कोटी २ लाख रुपयांची पिक विमा नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. या अंतर्गत पुणतांबा मंडळातील सुमारे ६८०७ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत उत्पादन आधारित नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.

मागील वर्षी खरीप हंगामात झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे पुणतांबा परिसरातील अनेक शेतकऱ्यांची पिके काढणीच्या टप्प्यावर असतानाच पूर्णपणे भुईसपाट झाली होती. सोयाबीन, बाजरी, कापूस, तूर, मका तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत



मिळावी यासाठी महसूल व कृषी विभागाला सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर राज्य शासन आणि संबंधित विमा कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले असून पुणतांबा मंडळातील ६८०७ शेतकऱ्यांसाठी १२.०२ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

आमदार आशुतोष काळे म्हणाले की, शेतकरी हा देशाचा कणा असून नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीत महायुती शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा केला. त्यातून ही मोठी मदत मंजूर झाली असून लवकरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.पिक विम्याच्या नुकसान भरपाईच्या मिळणाऱ्या रक्कमेतून अतिवृष्टीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.तर आमदार आशुतोष काळे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.श्रीम. सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, कृषी मंत्री ना. दत्तामामा भरणे, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांचे आभार मानले आहे.

# महिला डॉ. गौरी चौरे आत्महत्या प्रकरणी गोरगाव ग्रामस्थ आक्रमक

### तीन दिवसांत आरोपींना अटक करण्याचे डि.वाय.एस.पी. शिरीष वमणे यांचे आश्वासन

**● पारनेर । वीरभूमी–**

गोरगाव येथील महिला डॉ. गौरी सुनील चौरे आत्महत्या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने संतप्त नागरिकांनी सोमवारी पारनेर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले.

दहा दिवस उलटूनही पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत नागरिक, नातेवाईक व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यात जमा झाले होते. आरोपींना तात्काळ अटक करा तसेच पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

महिला डॉ. गौरी चौरे यांना हुंड्यासाठी व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू व सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी आरोपी अद्याप फरार असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. आंदोलनामुळे पोलीस ठाणे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.



यावेळी ग्रामस्थांच्या वतीने पोलिस प्रशासनाला दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. पहिल्या निवेदनात डॉ. गौरी चौरे यांनी गोरगाव येथे आत्महत्या केल्याचा उल्लेख करत त्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पती, सासू व सासऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आरोपी खुलेआम फिरत असून त्यामुळे पुरावे नष्ट होण्याची तसेच पीडित कुटुंबीयांवर दबाव येण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. आरोपींना त्वरित अटक करून कठोर शिक्षा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या विलंबित कारवाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये तत्काळ कारवाई होणे आवश्यक आहे.

### आरोपींना अटक करण्याचे आश्वासन

■ आंदोलनाची माहिती मिळताच पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी तातडीने डि.वाय. एस.पी. शिरीष वमणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची गंभीरता निदर्शनास आणून दिली. त्यानंतर डि.वाय. एस.पी. शिरीष वमणे हे तातडीने पारनेर पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्यांनी उपस्थित ग्रामस्थांशी चर्चा करून येत्या तीन दिवसांत संबंधित आरोपींना अटक करण्याचे स्पष्ट आश्वासन दिले.

मात्र, या प्रकरणात दहा दिवस उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने जनतेचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होत आहे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. तसेच या प्रकरणाचा वेगाने तपास करून पीडितेला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

## महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा दहावी परीक्षेत १००% निकाल



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

येथील महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलने इयत्ता दहावीच्या परीक्षेत १००% निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत उज्ज्वल यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभल्यामुळे विद्यालयाने हे यश मिळविले. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

प्रथम क्रमांक मिळवत प्रगती रवींद्र गिरमकर हिने ९३.८०% गुण मिळवले. दिग्विजय गणेश आधोरे याने ८८% गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला तर सृष्टी रामा कोथिंबीरे हिने ८६.८०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच अमन अरिफ मालजप्ते (८५.६०%), अर्णव निलेश भंडारी (८४%), वैष्णवी मच्छिंद्र डांगे (८३.४०%), शौर्य विक्रमसिंह पाटील (८३.२०%), असफरीन राजू खान (७७.८०%), ओम संदीप बोरुडे (७७.६०%), सुजल मोहन भोंग (७६%), ओमकार कुंडलिक घालमे (७५.४०%), ऋग्वेद दिलीप कोथिंबिरे (७४.८०%), प्रियंका सुशांत उदमले (७४.४०%), श्रावणी सचिन जाधव (७०.४०%), प्रेमेश पांडुरंग जाधव (७०%) आणि श्रीमंतआर्याराजे अशोक भोसले (६९.४०%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, प्राचार्य दिलीप भुजबळ, ज्योती भोपे, सर्व स्कूल कमिटी सदस्य, वर्गशिक्षिका आशा उंडे, विषय शिक्षक पूनम जाधव, संदीप कोळपे, अमोल घोलप, शुभांगी शिंदे, सारिका जमदाडे, पोपट झुंजरुक व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सभासदांनी दाखविला समता पतसंस्थेवर विश्वास

## १५ टक्के लाभांश सभासदांच्या खात्यात जमा : चेअरमन काका कोयटे



**कोपरगाव । वीरभूमी –** गेल्या ४० वर्षांपासून सभासदांचा विश्वास संपादन करत यशस्वी वाटचाल करणाऱ्या समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पुन्हा एकदा सभासदांनी संस्थेवर ठाम विश्वास व्यक्त केला. स्व. यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात झालेल्या या सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा ताळेबंद व नफातोटा पत्रक मांडण्यात आले. यावेळी सर्व सभासदांनी सर्व ठराव हात वर करून मंजुर करण्यात आले. समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी संस्थेच्या सर्व ठेवी १०० टक्के सुरक्षित असल्याचा विश्वास व्यक्त केला.

सभेत मांडण्यात आलेल्या आर्थिक अहवालानुसार, दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे ११२८ कोटी रुपयांच्या ठेवी असून ८२४ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच संस्थेची सुरक्षित गुंतवणूक ३१६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. जगातील सर्वाधिक सुरक्षित मानल्या जाणाऱ्या सोनेतारण कर्ज योजनेंतर्गत संस्थेने तब्बल ५८५ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. संस्थेला आर्थिक वर्षअखेर १३ कोटी रुपयांचा ढोबळ नफा झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

यावेळी बोलताना काका कोयटे म्हणाले, सभासदांनी गेल्या चार दशकांपासून समतावर जो विश्वास ठेवला आहे, तोच संस्थेची खरी ताकद आहे. संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत असून भविष्यातही अधिक पारदर्शक आणि सुरक्षित सेवा देण्याची आम्ही खात्री देतो.

संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद पटेल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, समता म्हणजे कुबेराचा खजिना आहे. तो कधीही रिकामा होणार नाही. सभासदांच्या आशीर्वादाने तो आणखी भरत राहील.

यावेळी कोपरगाव प्रगत विविध कार्यकारी सोसायटीचे राजेंद्र गिरमे यांनी सांगितले की, प्रगत सोसायटीचे व्यवस्थापन समताने स्वीकारले असून समताच्या सहकार्याने सभासद शेतकऱ्यांसाठी अल्पदरात ड्रोनद्वारे औषध फवारणीचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सरव्यवस्थापक सचिन भट्टड यांनी वाचून दाखवले. त्यांनी सांगितले की, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे समताने राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. सेल्फ बँकिंग प्रणालीद्वारे व्हाऊचरलेस व्यवहार, मिस्ड कॉलवर ओटीपीच्या माध्यमातून पैसे मिळण्याची सुविधा यामुळे ग्राहकांचा वेळ वाचत असून व्यवहार अधिक पारदर्शक झाले आहेत. त्यामुळे सभासदांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. तसेच समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीमअंतर्गत ९९.९४ टक्के ठेवीदारांच्या ७० लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सभेत संस्थेच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त नफा वाटपातून २५ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सप्टेंबर महिन्यात सर्व सभासदांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात येणार असल्याची घोषणाही करण्यात आली.

संचालक संदीप कोयटे यांनी अशोक खरात प्रकरणाबाबत खुलासा करत सर्व व्यवहार कायदेशीर असून सभासदांनी विपर्यस्त वृत्तांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत त्यांनी हात जोडून नतमस्तक होत संचालक मंडळाच्या वतीने सभासदांनी ठेवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले.

राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळीला दिलासा देण्याचे काम समता पतसंस्थेने केले असल्याचे आशुतोष पटवर्धन यांनी सांगितले. शाम क्षीरसागर म्हणाले की, सोनेतारण कर्ज हे सर्वाधिक सुरक्षित कर्जप्रकार असल्याने समताच्या ठेवीदारांच्या ठेवी अतिशय सुरक्षित आहेत. चंद्रकांत शिंदे यांनी सांगितले की, सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समताने कोपरगावकरांचा विश्वास संपादन केला असून आजही नागरिकांचा संस्थेवर मोठा विश्वास आहे.

सभेदरम्यान अहिल्यानगर शाखेचे सभासद व अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकरी बँकेचे माजी कार्यकारी संचालक आर. डी. मंत्री यांनी समताच्या कार्याचे कौतुक केले. आमचा अनेक वर्षांपासून समता पतसंस्थेवर विश्वास आहे. आमच्या ठेवी सुरक्षित असल्याने आम्ही इतरांनाही समतात ठेवी ठेवण्यास प्रोत्साहित करणार आहोत, असे ठेवीदार सी. बी. वक्ते यांनी सांगितले.

सभेस संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद पटेल, जेष्ठ संचालक जितुभाई शहा, संचालक संदीप कोयटे, अशोक दरक, दीपक अग्रवाल, गिरीष सोनेकर, कचरू मोकळ, भरत अजमेरा, चांगदेव शिरोडे, कायदेविषयक सल्लागार विजय गवांदे, टॅक्स सल्लागार दत्तात्रय खेमनर यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. उपस्थितांचे आभार अरविंद पटेल यांनी मानले.

### महत्वाच्या घोषणा

■ १) संस्थेने सर्वसाधारण सभेत सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर केला. विशेष म्हणजे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वार्षिक सभा संपल्याबरोबर लाभांशाची रक्कम सभासदांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली. सभासदांना मोबाईलवर एसएमएस प्राप्त झाल्याने सभागृहात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

■ २) सभेदरम्यान सभासद व ठेवीदारांनी संस्थेवर विश्वास दाखवत कोट्यवधी रुपयांच्या नवीन ठेवी जाहीर केल्या.

■ ३) सभेत संस्थेच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त नफा वाटपातून २५ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सप्टेंबर महिन्यात सर्व सभासदांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात येणार असल्याची घोषणाही करण्यात आली.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात दहावी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार

**पाथर्डी । वीरभूमी–** तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल ९५.२९ टक्के इतका लागला आहे. यावर्षीही विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली असून यावर्षी प्रथम पाच क्रमांकावर मुलींनी बाजी मारली आहे. विद्यालयात प्रथम आलेल्या पाच गुणवंत व त्यांच्या पालकांचा विद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.



कासार पिंपळगाव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९५.२९ टक्के इतका लागला. विद्यालयातून अनुश्री साईनाथ राजळे हिने ९३ टक्के मिळवत विद्यालयात व केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक मयुरी रामेश्वर पवळे–९१.४० टक्के, तृतीय क्रमांक मनस्वी मिलिंद लवांडे–९०.८० टक्के, चतुर्थ क्रमांक अंजली गजानन दळवी–९०.४० टक्के व पाचवा क्रमांक वैष्णवी महादेव दळे– ८९.६० टक्के हिने मिळवला.

विद्यालयाच्यावतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांचे पालक सौ. सोनिया राजळे, सौ. मनिषा पवळे, सौ. सविता लवांडे, गजानन दळवी, महादेव दळे यांचा सत्कार मुख्याध्यापक पांडुरंग गोसावी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवाजी लवांडे, विजय भताने, विनोद सरोदे, अभयसिंह चितळे आदीसह शाळेचे कर्मचारी व पालक उपस्थित होते.

# लायन सुनिता मालपाणी यांची डिस्ट्रिक्ट ३२३४-डी २ च्या उपप्रांतपालपदी निवड

**संगमनेर । वीरभूमी–** लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४–डी २ (पुणे–नाशिक–अहिल्यानगर) च्या लायनिस्टिक वर्ष २०२६–२७ साठी सेकंड व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पदावर लायन सुनिता गिरीश मालपाणी यांची बिनविरोध झालेली निवड ही संगमनेरसाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब मानली जात आहे. त्यांच्या या दणदणीत आणि ऐतिहासिक निवडीमुळे लायन्स चळवळीत संगमनेरच्या नेतृत्वाचा प्रभाव अधिक ठळकपणे अधोरेखित झाला आहे. समाजसेवा, संघटन कौशल्य, प्रभावी नेतृत्व आणि



संवेदनशील कार्यपद्धती यांच्या बळावर त्यांनी लायन्सच्या माध्यमातून उभारलेले कार्य आज जिल्हाभर प्रेरणादायी ठरत आहे.

लायन सुनिता मालपाणी या लायन्स क्लब इंटरनॅशनल अंतर्गत कार्यरत असलेल्या लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायर या प्रतिष्ठित क्लबच्या माजी अध्यक्षा असून, त्यांच्या नेतृत्वकाळात क्लबने अनेक नाविन्यपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सायन्स एक्स्पो, सफायर आयडॉल, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजूंसाठी अन्नधान्य वितरण, पर्यावरण संवर्धन, दिव्यांगांसाठी सहाय्य, रक्तदान शिबिरे आणि सामाजिक जनजागृती अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्यात सेवाभाव, व्यवस्थापन कौशल्य आणि समाजाप्रती असलेली प्रामाणिक बांधिलकी सातत्याने दिसून आली आहे.

# पारनेरकरांनी अनुभवला निकाली कुस्त्यांचा थरार

## कालीचरण सोलकर व अक्षय कावरे यांच्या दमदार विजयाने रंगले मैदान

**पारनेर । वीरभूमी–** पारनेर शहरात रविवारी आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती मैदानात नामांकित मल्लांच्या झुंजींनी कुस्तीशौकिनांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. पारंपरिक माती कुस्तीतील विविध डावपेचांचा थरार अनुभवण्यासाठी नगरसह पुणे जिल्ह्यातील हजारो कुस्तीप्रेमींनी मैदानावर गर्दी केली होती. धोबीपछाड, टांग, मोळी, लंग, ढाक, चक्री, गरदनी, यकचॅक, दुहेरी पट, एकलंघी आणि इराणी यांसारख्या थरारक डावांचा नजराणा मल्लांनी सादर करत मैदान दणाणून सोडले.

मैदानातील पहिल्या क्रमांकाची तब्बल एक लाख रुपयांच्या इनामाची कुस्ती कोल्हापूरच्या कालीचरण सोलकर आणि सोलापूरच्या समीर शेख यांच्यात रंगली. दोन्ही मल्लांनी आक्रमक आणि चुरशीचा खेळ करत उपस्थितांची वाहवा मिळवली. जवळपास पंधरा मिनिटे चाललेल्या या नेत्रदीपक झुंजीत कालीचरण सोलकर याने अचूक ‘यकचॅक’ डाव टाकत समीर शेख यास चितपट केले. या विजयाने मैदानात एकच जल्लोष उसळला.

दुसऱ्या क्रमांकाची कुस्ती स्थानिक मल्ल व पुण्याच्या गोकुळ वस्ताद तालीमचा पठ्ठा अक्षय कावरे आणि मामासाहेब मोहळ तालीमचा सुरेश बंडगर यांच्यात झाली. तब्बल वीस ते बावीस मिनिटे रंगलेल्या या झुंजीने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. सुरेश बंडगर याने एकलंघी, इराणी आणि यकचॅक यांसारखे डाव वापरत अक्षय कावरेला चितपट करण्याचे अनेक प्रयत्न केले; मात्र अक्षय कावरे याने संयमी आणि चपळ खेळ करत त्याचे सर्व डावपेच उधळून लावले. अखेरीस अक्षय कावरे याने दुहेरी पट डाव काढत ही लढत जिंकली आणि उपस्थितांकडून भरभरून दाद मिळवली.

मुख्य लढतींसह इतर २५ ते २७ कुस्त्याही प्रेक्षणीय ठरल्या. चितपट कुस्त्यांचा थरार अनुभवण्यासाठी प्रेक्षकांनी मैदानात मोठी गर्दी केली होती. प्रत्येक डावानंतर उसळणारा जल्लोष आणि मल्लांच्या दमदार खेळामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

इंदापूर येथील हलगी पथकाने आपल्या दमदार वादनाने मैदानातील वातावरण आणखी रंगतदार केले. समालोचक अक्षय मुळूक यांनी प्रभावी समालोचन करत उपस्थितांसमोर कुस्तीचा इतिहास, परंपरा आणि विविध डावपेच जिवंत केले.



ज्येष्ठ पैलवान स्व. मार्तंडनाना पठारे यांचे बंधू किसन भिकाजी पठारे यांच्या हस्ते तसेच माजी नगराध्यक्ष विजय औटी यांच्या उपस्थितीत मैदानाचे उद्घाटन करण्यात आले. नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे यांच्या नियोजनातून आयोजित करण्यात आलेल्या या मैदानासाठी नगर आणि पुणे जिल्ह्यातील मल्ल, पंच व कुस्तीशौकिनांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

यावेळी शाहीर भास्कर गायकवाड, वसंत चेडे, विजय औटी, कांतीलाल ठाणगे, दत्ता आंबुले, पांडूरंग खोडदे, दगडू शेरकर, दादाभाऊ नरसाळे, बाबाजी वाळुंज, साहेबराव पवार, रावसाहेब चत्तर, पोपट गांगर्डे, राष्ट्रीय पंच डॉ. संतोष भुजबळ, पंच गणेश जाधव, आर. डी. औटी, धनंजय खर्से, प्रमोद गोडसे, संभाजी मगर, अशोक कावरे, दत्ताशेठ कुलट, सहदेव तराळ, अर्जुन चौधरी, अर्जुन भालेकर, पंढरीनाथ चेडे, अकील शेख, संतोष औटी, डॉ. सचिन औटी, रामदास औटी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.